महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळे:तस्थळ : www.mahadiscom.in
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecomm@mahadiscom.in

**क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१७-१८/ 025606** **दिनांक : 17 OCT 2017**

**परिपत्रक क्र. 251**

**विषय :-** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. १५९,६०,००,०००/- (रुपये एकशे एकोणसाठ कोटी साठ लाख फक्त)

**संदर्भ :-** शासन ज्ञापन क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.४५/वित्त-२ दि.११.०७.२०१७.

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता अनुदानासाठी रक्कम रुपये २२८,००,००,०००/- (रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, त्यापैकी अर्थसंकल्पीय तरतूदच्या ७० % रक्कम रुपये १५९,६०,००,०००/- (रुपये एकशे एकोणसाठ कोटी साठ लाख फक्त) वरील संदर्भीय शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला दि.१६.१०.२०१७ रोजी रोखीत प्राप्त झालेले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, संबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत करण्यात येत असून सदर रक्कम फक्त ग्रामपंचायत वीज दिव्यांच्या जोडण्यांनाच वर्ग झाली आहे याची खात्री संबंधित बिलींग कक्षाने करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०१७-१८) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह सादर :-**
१. कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान व ग्राहक सेवा), प्रकाशगंगा, मुंबई.
----माहिती व उचित कार्यवाहसाठी
२. सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालय.
३. मुख्य महाव्यवस्थापक / (सांघिक लेखा) /(सांघिक वित्त) म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.
----माहिती व उचित कार्यवाहसाठी

**प्रत रवाना :**
१. सर्व अधिक्षक अभियंता, संवसु मंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकॉंग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. सर्व कार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालय, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंता / सहाय्यक अभियंता, संवसु उपविभागीय कार्यालय.
---- उचित कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner

Sr manager (F&A)
Commercial
pls. discuss
5/10/17

OFFICE OF CMD, MSEDCL
DIR-FIN | DIR-OP | DIR-PROJ
ED-COM | ED-DIST | ED-INFRA
ED-PROJ | ED-HR | ED
FOR NECESSARY ACTION

# महाराष्ट्र शासन

शासन ज्ञापन क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.४५/वित्त-२

ग्रामविकास व जलसंधारण विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक:- ११ जुलै, २०१७

विषय:- अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१७-२०१८
मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.२००इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे- (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५)

Dir(Fin) pl

**शासन ज्ञापन-**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान (३६०४०३२५) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता रु.२२८,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे

२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३ दि. १८ एप्रिल, २०१७ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८० % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली होती. तथापि, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/ प्र.क्र.९४/अर्थसंकल्प-३ दि. ३० जून, २०१७ अन्वये अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ७०% च्या मर्यादेत अनुदान वितरणास अनूमती आहे. दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ मधील सर्व अटी व शर्ती आणि परिशिष्ट मधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी ७०% च्या मर्यादेत रु. १५९,६०,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे एकोणसाठ कोटी साठ लक्ष फक्त) इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) उपलब्ध करुन देण्यास व वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर तरतूद सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाव्दारे कार्यासन अधिकारी, रोखशाखा, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, यांचे

MCW
CGM/IA

Date: 6/10/17
Sr. M. (Com.)
S. E. (Com.I)
S. E. (Com.II)
S. E. (CP)
S. E. (RUC)

Scanned by CamScanner

अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढावयाचा आहे. श्रीमती रा. अ. ताठरे, कार्यासन अधिकारी, रोखशाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. प्र. ना. वळवी, उप सचिव (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे.

३. या करीता. रु. १५९,६०,००,०००/- (**अक्षरी रुपये एकशे एकोणसाठ कोटी साठ लक्ष फक्त**) इतक्या अनुदानास मंजूरी देण्यात येत आहे. इतके अनुदान खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा.

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांनी ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवून त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन १०८९/प्र.क्र.३०२७/२८, दि. ०५.०९.१९९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

४. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. प्र.ना. वळवी, उप सचिव (रोखशाखा), ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .



Scanned by CamScanner

५. या शासन ज्ञापनाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च मागणी क्र.एल-५, "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)-५० -इतर खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. हे शासन ज्ञापन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३ दि. १८ एप्रिल, २०१७ मधील तरतूदी तसेच शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/ अर्थसंकल्प-३ दि. ३० जून, २०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(पां.रा.खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर .

महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ), मुंबई ४०० ०५१.

मुख्य अभियंता (वाणिज्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड (वाणिज्य विभाग), ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१

अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.

निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा , कोकण भवन , वाशी , नवी मुंबई

उप लेखा परिक्षक , नवी मुंबई , वाशी /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर



Scanned by CamScanner

अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)
कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.
वित्त विभाग (अर्थसंकल्प १७ / व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.
निवडनस्ती ,वित्त-२ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

Scanned by CamScanner